# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 16.04.2024** **वार: मंगळवार**

---

**नियुक्ती**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी नियुक्त झालेल्या पुणे जिल्ह्यातल्या कर्मचाऱ्यांपैकी अनेकांकडून ही नियुक्ती रद्द करण्यासाठीचे अर्ज दिले जात आहेत. हे अर्ज स्वीकारण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसात 175 जणांचे अर्ज या कक्षाकडं दाखल झाले आहेत. सुटीत गावाला घरी जाण्यासाठीचे तिकीट आधीच काढलं आहे, नातेवाईकांचं आजारपण, मृत्यू तसंच वैद्यकीय कारणं यासाठी देण्यात येत आहेत. अनेक कर्मचाऱ्यांकडून निवडणूक कामासाठीचं ठिकाण बदलून देण्याची किंवा अधिकार पदांमध्ये बदल करण्याची मागणी केली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार या अर्जांवर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असं निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी स्पष्ट केलं आहे .

धंगेकर पुणे लोकसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी आज काँग्रेस भवनात कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

सत्य शोधक बहुजन आघाडी

सत्यशोधक बहुजन आघाडीनं लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. सत्यशोधक बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष सचिन बगाडे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**<u>कपिल देव</u>**

ज्येष्ठ क्रिकेटपटू कपिल देव यांनी आज पुण्यात एका खाजगी कार्यक्रमात नागरिकांनी शंभर टक्के मतदानाचा हक्क बजावावा असं आवाहन केलं. सरकार चालवण्यासाठी चांगल्या राजकीय व्यक्ती जर तुम्हाला हव्या असतील, तर मतदान करा, असं कपिल देव म्हणाले.

**<u>दिव्यांग</u>**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत दिव्यांग व्यक्तीच्या 'हयात दाखल्या' बाबत त्यांचं घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आलं. सुमारे सात हजार दिव्यांग व्यक्तींचं सर्वेक्षण पूर्ण करण्यात आलं आहे. अशा प्रकारचा उपक्रम राबविणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका राज्यातली पहिली महानगरपालिका ठरली आहे.

**<u>स्मार्ट मीटर</u>**

पुणे महावितरणकडून 'स्मार्ट प्रीपेड मीटर' मोफत लावण्यात येणार आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून निश्चित केलेले वीजदर या मीटरसाठी लागू राहणार आहेत. पुणे, पिंपरी-चिंचवड शहर, आंबेगाव, जुन्नर, मावळ, खेड, मुळशी, वेल्हे, हवेली तालुक्यांमध्ये सिंगल आणि थ्रीफेजच्या सुमारे 32 लाख दहा हजार वीजग्राहकांकडे 'स्मार्ट प्रीपेड मीटर' बसविण्यात येणार आहे. या स्मार्ट मीटरमुळे मीटरचे रीडिंग घेणे, वीजबिल तयार आणि वितरित करणे ही कामं बंद होतील, असं पुणे परिमंडलचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी सांगितलं.

**<u>ई पीक पाहणी</u>**

सुधारित ई पीक पाहणी-३ या ॲपसाठी यंदा उन्हाळी हंगामात राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यातल्या एक तालुक्याची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यातल्या दौंड तालुक्याचा समावेश आहे. ई-पीक पाहणीच्या नोंदी या पीक विमा घेण्यासाठी, पीक विम्याचे दावे निकाली काढण्यासाठी, पीक कर्जवाटप, नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास अचूक भरपाई आदी बाबींसाठी आवश्यक असल्याचं भूमी अभिलेख विभागाकडून  सांगण्यात आलं.

**भुर्के**

विद्यार्थ्यांनी चांगल्या कथांचं वाचन आणि श्रवण केल्यास आपलं वक्तृत्व कौशल्य विकसित करता येईल, असं मत ज्येष्ठ लेखक श्याम भुर्के यांनी व्यक्त केलं आहे. ते आज पुण्यात डीइएस सेकंडरी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत तीन दिवस चालणाऱ्या व्याख्यानमालेत बोलत होते.

**पाणी**

धरणात असलेला अत्यल्प पाणी साठा आणि महापालिका प्रशासनानं केलेल्या पाणी बचतीच्या आवाहनाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातल्या अनेक हॉटेल व्यावसायिकांनी पाणी वापरावर नियंत्रण आणलं आहे. शहरातल्या फर्ग्युसन  रस्त्यावरील प्रमुख हॉटेल चालकांनी यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. ग्राहकांनी मागितल्याशिवाय पाणी न देणं, अर्धाच ग्लास पाणी देणं यांचं पालन केलं जात आहे. अनेक मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांनी पाण्याची होणारी गळती रोखण्याचं काम हाती घेतलं आहे. तसंच अनेक सोसायट्यांमधून दुपारी 1 ते 6 वाजेपर्यंत पाणी पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**क्राइम**

पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकानं कोथरूडमध्ये आयपीएल क्रिकेट सामन्यावर सट्टा घेणाऱ्या 10 सट्टेबाजांवर कारवाई केली. पोलिसांनी लॅपटॉप, मोबाइल संच आणि रोकड असा सुमारे अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

**क्रीडा**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं लायन्स् प्रौढ करंडक'  टी-20 क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. जय ढोले याच्या गोलंदाजीच्या जोरावर जेडब्ल्युडी मॅजीशियन्स् संघानं स्मार्ट लायन्स संघाचा 84 धावांनी पराभव केला. तर प्रफुल्ल मानकर याच्या अचूक गोलंदाजीमुळे गार्गी एज्युकेशन संघानं न्युट्रीलिशियस संघाचा 2 गडी राखून पराभव केला.

पुणे आणि परिसरात कमाल तापमान 40 ते 41 अंशांच्या दरम्यान कायम आहे. संध्याकाळनंतर ढगांच्या गडगडाटासह तुरळक पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**